# व्ही. टी. पाटील यांचे कार्य प्रेरणादायी

## सुभाष देसाई : ताराराणी विद्यापीठात स्मृतिदिनी पुरस्कार वितरण सोहळा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : बहुजन समाजाची पारख असणारे शिक्षणमहर्षी डॉ. व्ही. टी. पाटील यांचे सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रांतील योगदान आजच्या युवा पिढीसाठी प्रेरणादायी आहे, असे उद्गार भारतीय तत्त्वज्ञानाचे अभ्यासक डॉ. सुभाष देसाई यांनी काढले. 'डॉ. व्ही. टी. पाटील व्यक्ती आणि कार्य' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले.

ताराराणी विद्यापीठात संस्थापक डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या २५ व्या स्मृतिदिनानिमित्त पुरस्कार वितरण सोहळा झाला. कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते कमला महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाच्या डॉ. अनघा पाठक यांना 'ताराराणी आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान केला. शाल, श्रीफळ, सन्मानपत्र व रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरुप होते.




ताराराणी विद्यापीठात पुरस्कार वितरण समारंभात प्रा. डॉ. सुभाष देसाई यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी अशोक पर्वते, डॉ. एस. एन. पवार, प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्राजक्त पाटील, आदी उपस्थित होते.

प्रारंभी डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते केले. शाहीर आझाद नायकवडी आणि विद्यार्थ्यांनी स्मृती गीते गायली. यावेळी डॉ. सुभाष देसाई म्हणाले, शासन दरबारी विविध पदे भूषविणारे डॉ. व्ही. टी. पाटील यांनी महिला सक्षमीकरणामध्ये लष्करी केंद्र उभारण्याचा मानस व्यक्त करणारे व त्यासाठी ताराराणी विद्यापीठात भारतातील पहिला महाराणी ताराराणी यांचा प्रेरणादायी पुतळा उभा करण्याचे ऐतिहासिक कार्य केले.

प्रास्ताविक डॉ. सुजय पाटील यांनी, तर स्वागत पी. आर मंडलिक यांनी केले. पुरस्काराचे निवेदन सचिव प्राजक्त पाटील यांनी केले. एम. डी. चव्हाण यांनी आभार मानले. संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. एस. एन. पवार, डॉ. अशोक पर्वते, सचिव प्राजक्त पाटील, प्राचार्य सी. आर. गोडसे, प्रा. ए. एम. साळोखे, आदी उपस्थित होते.

दै. लोकमत - 25/01/2020

Scanned by CamScanner